(3)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

M. S. Board Of Secondary And
Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board,
Vashi, Navi Mumbai- 400 703.

Telephone : 27652445, 27662504, 27881077, 27881075, 27899987 Email : sschsc.mumbaiboard@gmail.com
Branch Email : certificate.mumbaiboard@gmail.com * Website : www.sscboardmumbai.in

क्र.मुंविमं/शाखा एन / / 2404
नवी मुंबई - 400703
दिनांक - 13/05/2026
21

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक,
तसेच कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्राचार्य,
जिल्हा मुंबई/ठाणे/पालघर/रायगड

विषय - इ.१० वी व इ.१२ वी गुणपत्रक / प्रमाणपत्र शुल्काबाबत.....

संदर्भ - क्र.रा.मं./लेखा -६/१९०८ दि.०७/०५/२०२६ चे पत्र

मुंबई विभागीय मंडळ, वाशी नवी मुंबई या विभागातील सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक तसेच कनिष्ठ महाविद्यालय यांचे प्राचार्य यांना उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु / मार्च २०२६ च्या परीक्षेपासून विद्यार्थ्यांना गुणपत्रक व प्रमाणपत्र एकत्रित छपाई करुन देणेबाबतचा विषय दि.०४/०५/२०२६ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेमध्ये ठराव क्र. ३० अन्वये पारीत झालेला आहे.

तथापि इ.१० वी व इ.१२ वी फेब्रु / मार्च २०२६ परीक्षेसाठी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रती विद्यार्थी स्वतंत्र गुणपत्रक रु.२०/- व प्रमाणपत्र रु.२०/- असे शुल्क आकारण्यात आलेले आहे. तथापि फेब्रु / मार्च २०२६ परीक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना मंडळाकडून एकत्रितरित्या करुन देण्यात येणार आहे.

सबब फेब्रु / मार्च २०२६ च्या परीक्षेपासून व त्या पुढील परीक्षांकरीता विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गुणपत्रक व प्रमाणपत्रावर क्युआर कोड, विद्यार्थ्याचा फोटो तसेच साईज अ ४ इ. असणार आहे. त्यामुळे जून/जुलै - २०२६ च्या परीक्षेपासून गुणपत्रक रु.२०/- व प्रमाणपत्र रु.२०/- असे स्वतंत्र शुल्क न दाखवता एकत्रितरित्या गुणपत्रक व प्रमाणपत्र शुल्क रु.४०/- आकारण्यात येणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई -४००७०३